महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125


## दिन विशेष...

१९७२ :भारत-बांगलादेश यांच्यात मैत्रीचा करार

१७५४ : अहिल्यादेवी होळकर यांचे पती खंडेराव होळकर यांचे निधन झाले.

१८४८ : लोकहितवादी यांनी 'शतपत्र' या लेखनास केली सुरुवात.

१९६२ : पुणे योथील राजा केळकर संग्रहालय जनतेसाठी खुले करण्यात आले.

सेन्सेक्स ७८,२०५.९८ +६३९.८२ (०.८२%)
डॉलर ₹ ९१.९६

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ४० | १९ |
| दिल्ली | ३५ | २० |
| मुंबई | ३९ | २४ |
| नागपूर | ३७ | २० |
| पुणे | ३८ | १७ |


epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | गुरुवार, दि.१९ मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक १२७ किंमत : ५ रु. | पाने ४


## आज गुढीपाडवा



हिंदू नववर्षानिमित्त वाचक, जाहिरातदार,वार्ताहर, वृत्तपत्र एजंट यांना हार्दिक शुभेच्छा
– मुख्य संपादक

## थोडक्यात

### धोनी आता ७ नव्हे तर ८ नंबरच्या जर्सीत दिसणार

**मुंबई ।** आयपीएल २०२६ स्पर्धेत चेन्नई सुपर किंग्ज संघ आपला पहिला सामना राजस्थान रॉयल्स संघाविरूद्ध खेळणार आहे. या स्पर्धेला सुरूवात होण्याआधी धोनीने आपल्या सोशल मिडिया अकाऊंटवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. क्रिकेटमध्ये ७ क्रमांकाची जर्सी म्हटलं, तर सर्वांना धोनी आठवतो. पण यावेळी तो ७ नव्हे, तर ८ क्रमांकाची जर्सी परिधान करून मैदानात उतरणार असल्याचं म्हटलं जात आहे. धोनीने एक व्हिडीओ शेअर केला आहे. यात त्याने लिहिले की, ७ क्रमांकाची आठवण नेहमी मनात कायम असेल, पण आता बदल करण्याची वेळ आली आहे.

### राहुल गांधी संसदेत टपोरीसारखे येतात

**नवी दिल्ली ।** राहुल गांधी एखाद्या टपोरीसारखे संसदेत येतात. त्यांचं वर्तन चांगलं नाही. महिला खासदार त्यांच्याकडे पाहून अवघडतात. ऐ, तू अशी भाषा वापरतात. त्यांची वागणूक अजिबात चांगली नाही. तरतम भाव त्यांच्याकडे मुळीच नाही. त्यांच्या तुलनेत प्रियांका गांधी खूप चांगल्या आहेत. त्यांची वागणूक अशी नाही. त्या खूप चांगल्या पद्धतीने आणि नम्रतेने वागतात. राहुल गांधींनी जरा त्यांच्या बहिणीकडून शिकलं पाहिजे. असं कंगना रानौतने म्हटलं आहे. मंगळवारी २०० हून अधिक नोकरदार, सेवानिवृत्त सैन्य अधिकारी यांनी राहुल गांधींना एक खुलं पत्र लिहिलं आहे. यामध्ये त्यांनी राहुल गांधींच्या वर्तनाबाबत चिंता व्यक्त केली होती. संसदेच्या परिसरात राहुल गांधींचं वर्तन योग्य नाही. संसदेत वागायाचं कसं त्याचे काही नियम आहेत. मात्र राहुल गांधी ते कुठलेही नियम पाळत नाहीत.

# राजकारणात कधीही फुलस्टॉप नसतो

## निवृत्त खासदारांच्या निरोप समारंभाप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदींचं वक्तव्य

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**राज्यसभेतील निवृत्त होणाऱ्या खासदारांच्या निरोप समारंभाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज राज्यसभेत भाषण केलं. यावेळी पंतप्रधान मोदींनी निवृत्त होणाऱ्या सर्व खासदारांच्या कामाचं आणि योगदानाचं कौतुक केलं. तसेच विधिमंडळातील चर्चांसह विविध विषयांवरही मोदींनी भाष्य केलं. यावेळी पंतप्रधान मोदींनी एक महत्वाचं वक्तव्य केलं. 'राजकारणात कधीही फुलस्टॉप नसतो', असं म्हणत राज्यसभेत निवृत्त होणाऱ्या खासदारांना पंतप्रधान मोदींनी शुभेच्छा दिल्या.**



संसदेत कायम अनेक महत्वाच्या विषयांवर चर्चा होत असते. प्रत्येक सदस्य एक विशिष्ट भूमिका बजावत असतो. ही भूमिका बजावत असताना काही चांगले-वाईट अनुभव येत असतात. मात्र, आज अशा क्षणी पक्षीय मतभेदांच्या पलीकडे जाऊन एक समान आदराची भावना निर्माण होते. या ठिकाणी आज आपले काही सहकारी या सभागृहातून निरोप घेत आहेत, तर काही सहकारी पुन्हा सभागृहात येण्यासाठी निरोप घेत आहेत, असं पंतप्रधान मोदींनी म्हटलं.

आज सभागृहातून निरोप घेत असलेले काही सहकारी त्यांच्या जीवनात विशेष योगदान देण्यासाठी सभागृहातील अनुभव सोबत घेऊन पुढे जात आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की राजकारणात कधीही फुलस्टॉप नसतो. भविष्य तुमची वाट पाहत असतं. तुमचा अनुभव आणि तुमचं योगदान राष्ट्रासाठी कायम असलं पाहिजे, असं पंतप्रधान मोदी यावेळी म्हणाले.

**उपसभापतींच्या कामाचंही कौतुक**

पंतप्रधान मोदींनी यावेळी राज्यसभेचे उपसभापती हरिवंश सिंह यांच्या कामाचं कौतुक केलं. मोदी म्हणाले की, त्यांनी सभागृहाचं कामकाज अत्यंत शांत, नम्र आणि संयमितपणे चालवलं. हरिवंशजींना सभागृहात दीर्घकाळ सेवा करण्याची संधी मिळाली. याआधी त्यांनी देशाच्या कानाकोपऱ्यात काम केलेलं आहे.

**रामदास आठवलेंचंही केलं कौतुक**

रामदास आठवले हे देखील आज निवृत्त होत आहेत. मात्र, येथील कोणत्याही सदस्यांना त्यांची उणीव भासणार नाही. कारण सर्वांना खात्री आहे की ते उपहासाची मेजवानी आपल्याला देत राहतील, असं म्हणत पंतप्रधान मोदींनी रामदास आठवले यांचं कौतुक केलं. यावेळी निवृत्त झालेल्या राज्यसभा खासदारांसह नवीन निवडून आलेल्या राज्यसभा खासदारांना पंतप्रधान मोदींनी संसदेतील जुन्या अनुभवी खासदारांकडून संसदेचे कामकाज शिकण्याची विनंतीही केली.

### शरद पवारांचं कौतुक

**राजकारणात कधीही फुलस्टॉप नसतो. भविष्य तुमची वाट पाहत असतं. तुमचा अनुभव आणि तुमचं योगदान राष्ट्रासाठी कायम असलं पाहिजे, राज्यसभेत भाषण करताना पंतप्रधान मोदी यांनी शरद पवार आणि मल्लिकार्जुन खर्गे, एच.डी. देवेगौडा यांचं कौतुक केलं. मोदी म्हणाले की, या नेत्यांनी आपल्या आयुष्यातील अर्ध्याहून अधिक काळ संसदीय कामात घालवला आहे. एवढा प्रचंड अनुभव त्यांच्याकडे आहे, सर्व नवीन खासदारांनी त्यांच्याकडून शिकलं पाहिजे. समर्पित भावनेने सभागृहात येणं, समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडणं, ही सर्व ज्येष्ठ नेत्यांची प्रेरणादायी उदाहरणे आहेत. मी त्यांच्या योगदानाचं कौतुक करतो, असंही मोदी म्हणाले.**

## आरटीई प्रवेशाचा तिढा सुटला पालकांना मोठा दिलासा

### विद्यार्थ्यांना तीन ते पाच कि.मी. पर्यंतच्या शाळांमध्ये मिळेल प्रवेश

वृत्तसंस्था । कोलंबो

**बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) खासगी शाळांमध्ये २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशासाठी एक किमीपेक्षा अधिक अंतरातील शाळांचा पर्यायही पालकांना उपलब्ध करून देण्यातील आता तिढा सुटला आहे. त्यामुळे पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.**

एक किलोमीटर अंतरातील पालकांना प्रवेश घेण्याबाबतची अंतराची अट बेकायदेशीर असल्याचे सांगत यासंदर्भात आम आदमी पार्टी तसेच आप पालक युनियनने आंदोलन निवेदने, ई-मेलमार्गे ही अट काढण्याची मागणी शासनाकडे व शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्याकडे केली होती.

याबाबतीत नागपूर खंडपीठाकडे जनहित याचिका व रिट पिटीशन (पान २ वर)

## मुंबई-पुणे मार्गावर भीषण अपघात; तिघे जागीच ठार, चौघे जखमी

वृत्तसंस्था । अलिबाग

**मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर बुधवारी सकाळी झालेल्या भीषण अपघातात तीन जणांचा जागीच मृत्यू झाला, तर तीन ते चार जण जखमी झाले. नियंत्रण सुटलेल्या कंटेनर ट्रकने अनेक वाहनांना धडक दिल्यानंतर तो उलटून इनोव्हा कारवर कोसळल्याने हा अपघात घडला.**






पुणे द्रुतगती महामार्गावर बुधवारी सकाळी सुमारे १० वाजेच्या सुमारास मुंबईकडे जाणाऱ्या मार्गावर हा अपघात झाला. प्राथमिक माहितीनुसार, भरधाव वेगातील कंटेनर चालकाचा ताबा सुटल्याने त्याने मार्गावरील अनेक वाहनांना जोरदार धडक दिली. त्यानंतर कंटेनर डाव्या बाजूला उलटून थेट इनोव्हा कारवर आदळला. या भीषण दुर्घटनेत इनोव्हा कारमधील तिघांचा जागीच मृत्यू झाला. एकूण पाच वाहने या अपघातात नुकसानग्रस्त झाली आहेत.

अपघातानंतर तात्काळ बचावकार्य सुरू करण्यात आले. जखमींना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात हलविण्यात आले असून काहींची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. अपघातामुळे काहीकाळ वाहतुकीवर परिणाम झाला होता; मात्र पोलिसांनी तत्काळ वाहतूक सुरळीत केली. याप्रकरणी खोपोली पोलीस ठाण्यात कंटेनर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस तपास सुरू आहे. कंटेनर चालक नशेत असावा असा अंदाज परिसरातील नागरिकांनी व्यक्त केला आहे. त्यामुळेच त्याने ४ ते ५ वाहनाना धडक दिली.

## आरोग्य विद्यापीठाची लेखी परीक्षा २३ मार्चपासून!

वृत्तसंस्था । मुंबई



**महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या हिवाळी २०२५ टप्पा ४ मधील पदवी, पदव्युत्तर, तसेच विद्यापीठ संलग्नित विविध अभ्यासक्रमांच्या लेखी परीक्षांना २३ मार्चपासून सुरुवात होत आहे.**

या परीक्षा १० एप्रिल २०२६ पर्यंत चालणार आहेत. राज्यभरातील एकूण १७५ परीक्षा केंद्रांवर होणाऱ्या या परीक्षेला सुमारे ४३ हजार ९२८ विद्यार्थी बसणार असल्याची माहिती आरोग्य विद्यापीठाकडून देण्यात आली.पदवी स्तरावर वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या (एमबीबीएस) प्रथम ते चतुर्थ वर्षांच्या विविध सत्रांच्या परीक्षांबरोबरच बीएएमएस, बीयूएमएस आणि बीएचएमएस या आयुष अभ्यासक्रमांच्या विविध वर्षांच्या परीक्षा, तसेच बीएससी नर्सिंगच्या प्रथम सत्राच्या परीक्षांना २३ मार्चपासून सुरुवात होत आहे. (पान २ वर)

## जिल्हा परिषद, पंचायत समितीमध्येही आता स्वीकृत सदस्य !

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**युद्धग्रस्त इराणला भारताने मदतीचा हात दिला आहे. भारताने इराणला वैद्यकीय मदत पाठवली असून, औषधांची पहिली खेप इराणी रेड क्रेसेंट सोसायटीला सुपूर्द करण्यात आली आहे. भारतातील इराणच्या दूतावासाने याबाबत माहिती दिली आहे. आम्ही भारतातील लोकांचे मन:पूर्वक आभार मानतो, अशा शब्दात दूतावासाने भारताचे आभार मानले आहेत.**



महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) विधेयक २०२६ विधानसभेत सर्वानुमते मंजूर करण्यात आले. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी हे विधेयक मांडले. पालिका, नगरपालिका प्रमाणे जिल्हा परिषद व पंचायत समिती मध्ये स्थानिक पातळीवरील कला, संस्कृती क्षेत्रातील तज्ञ स्वीकृत सदस्य म्हणून नियुक्त केले जाणार आहेत. जिल्हा परिषदे मध्ये ही संख्या एकूण सदस्यांच्या २० टक्के तर पंचायत समितीमध्ये १० टक्के स्वीकृत सदस्यांना स्थान मिळणार आहे.ग्रामीण भागातील तज्ञ नागरीकांना जिल्हा परिषद व पं.समितीमध्ये स्थान मिळावे यासाठी हे विधेयक सरकारने सभागृहाच्या मंजूरीसाठी सादर केले असल्याचे गोरे यांनी सांगितले. नाना पटोले. विक्रम पाचपुते, प्रवीण स्वामी, प्रतापराव चिखलीकर, सुहास बाबर, राजकुमार बडोले, चंद्रदीप नरके, बाबासाहेब देशमुख, विठ्ठल लंघे या सदस्यांनी या विधेयकाचे स्वागत केले. विरोधी पक्षातील सदस्यांनी या विधेयकाला एकमताने पाठिंबा दिले आहे.

## दिल्लीत एका इमारतीला आग ७ जणांचा होरपळून मृत्यू



वृत्तसंस्था । नवी दिल्ली

दिल्लीतील पालमच्या साध नगरमधील एका बहुमजली इमारतीला भीषण आग लागली. तीन मुलांसह सात जणांचा मृत्यू झाला. मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आणि या प्रकरणाची दंडाधिकारी चौकशी करण्याचे आदेश दिले.

मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी एक्स प्लॅटफॉर्मवर लिहिले की, पालममधील एका बहुमजली निवासी इमारतीला लागलेल्या भीषण आगीबद्दल ऐकून त्यांना खूप दुःख झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सहा जणांचा मृत्यू झाल्याची भीती आहे आणि काही जण अजूनही आत अडकले आहेत.बचावकार्याबद्दल बोलताना त्या म्हणाल्या की, जिल्हा प्रशासन, (पान २ वर)

## ३९ व्या राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये मुंबई विद्यापीठाची सुवर्ण कामगिरी

### १० सुवर्ण पदकांसह १ रौप्य आणि ३ उत्तेजनार्थ पारितोषिके

वृत्तसंस्था । मुंबई

**३९ व्या राष्ट्रीय आंतर विद्यापीठीय युवा महोत्सवामध्ये मुंबई विद्यापीठाने सुवर्ण कामगिरी केली. या युवा महोत्सवात विद्यापीठाच्या चमूने विविध १४ स्पर्धांमध्ये मोठ्या गुणांची कमाई करत तब्बल १० सुवर्ण पदके आणि १ रौप्य पदकांसह ३ उत्तेजनार्थ पारितोषिके पटकावली. भारतीय विद्यापीठे संघ (एआययु) यांच्या निर्देशानुसार १० ते १४ मार्चदरम्यान चेन्नईतील सत्यभामा इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी येथे या राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात देशातील १४१ विद्यापीठे सहभागी झाली होती.**




संगीत, नाट्य, नृत्य, साहित्य आणि ललितकला या पाच विभागांत आयोजित स्पर्धांमध्ये मुंबई विद्यापीठाने संगीत विभागातून पाश्चिमात्य वाद्यवादन, पाश्चिमात्य समुह गायन, लोकवाद्यवृंद या स्पर्धांमध्ये ३ सुवर्ण पदके पटकावली. नाट्य विभागातील प्रहसन आणि मूक अभिनय (पान २ वर)

### १४ स्पर्धांमध्ये ठरला होता पात्र

**मुंबई विद्यापीठाने २८ स्पर्धांमध्ये २५ पारितोषिकांसह सर्वसाधारण विजेतेपदाचा बहुमान पटकावला, तसेच राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी मुंबई विद्यापीठाचा संघ एकूण १४ स्पर्धांमध्ये पात्र ठरला होता. या उत्कृष्ट कामगिरीबद्दल मुंबई विद्यापीठाच्या चमूचे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेचे नियोजन डॉ. सुनील पाटील यांनी केले.**

## भाजप आ.राजेश पवार यांच्या चौकशीचे कोर्टाचे आदेश

वृत्तसंस्था । नांदेड

**नांदेड जिल्ह्यातील भाजप आमदार राजेश पवार यांच्याविरोधात न्यायालयाने तपासाचे आदेश दिल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. नायगाव न्यायालयाने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५६(३) अंतर्गत पोलिसांना चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत.**

टेंभुर्णी (ता. नायगाव) येथील गट क्रमांक १७९ मधील आपल्या शेतात श्रीराम पवार यांनी उदरनिर्वाहासाठी बांबूची लागवड केली होती.



२४ जून २०२३ रोजी काही, जण जेसीबी मशिनसह शेतात घुसले आणि बांबूचे पीक तोडण्यास सुरुवात केली. विरोध केल्यानंतर, न्यायालयीन दावा मागे घे, नाहीतर परिणाम भोगावे लागतील, अशी धमकी देण्यात आली. तसेच जीवे मारण्याचीही धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.याप्रकरणाची कोर्टाने दखल घेतली आहे.

## संपादकीय

### संघर्षावर तोडगा काय ?

इराण विरुद्धचे युद्ध सुरू होऊन आता १८ दिवस होऊन गेले आहेत. अजूनही हे युद्ध संपण्याची () कुठलीही शक्यता नजरेच्या टप्प्यात आलेली दिसत नाही. या युद्धाशी ज्यांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध नाही असे अनेक देश या युद्धामुळे नाहक अडचणीत आल्याचे सध्याचे चित्र आहे. भारतासह जगातल्या अन्य देशांमध्ये गॅस आणि इंधन टंचाई भेडसावू लागली आहे. आखातातील ज्या देशांमध्ये अमेरिकेचे तळ आहेत त्या तळावर इराणने क्षेपणास्त्र हल्ले करून त्या देशांचेही मोठे नुकसान केले आहे. वास्तविक या आखाती देशांचाही इराण अमेरिका युद्धाशी () काहीही संबंध नव्हता. या युद्धामुळे जगातली पुरवठासाखळी विस्कळीत होऊ लागली आहे, विमान वाहतूक, जहाज वाहतूक खंडित झाली आहे. हे युद्ध आता कधी संपणार याकडे सगळे जग डोळे लावून बसलेले आहे, पण अमेरिका किंवा इस्रायल अजूनही माघारीला तयार नाहीत किंवा इराणही अजून हार मानायला तयार नाही. या सगळ्या पार्श्वभूमीवर या संघर्षावर तोडगा काय, असा प्रश्न आता जागतिक व्यासपीठावर उपस्थित होऊ लागला आहे. युद्धामुळे झालेले दुष्परिणाम सगळीकडेच चर्चेला आले त्यामुळे सगळीकडची वस्तुस्थिती जगातल्या सगळ्यांना समजली; पण युद्ध समाप्तीवर तोडगा काय यावर मात्र अजून कोणीही ठामपणे काहीही सांगताना दिसत नाही, किंबहुना हे युद्ध काय केल्याने थांबू शकेल याचा अजूनही अंदाज येताना दिसत नाही. इराणने शरणांगती पत्करावी अशी अमेरिका आणि इस्रायलची इच्छा आहे, पण इराण इतके प्रचंड नुकसान सोसूनही शरणागती पत्करायला तयार नाही आणि त्यामुळे त्यांच्याविरुद्धच्या कारवाया थांबवायला अमेरिका आणि इस्रायल राजी नाही अशी आजची स्थिती आहे. त्यामुळे या संघर्षावर आता प्रभावी मध्यस्थीची गरज निर्माण झाली आहे. तथापि ही मध्यस्थी कोण करणार हा प्रश्नही अनुत्तरितच राहिला आहे. संयुक्त राष्ट्रांसारख्या जागतिक संघटना अशा संघर्षाच्या विषयावर प्रभावी मध्यस्थी करू शकतात, पण आमच्या संघटनेची आता तेवढी ताकद राहिलेली नाही असे स्पष्ट वक्तव्य संयुक्त राष्ट्र संघाच्या सरचिटणीसांनीच केले आहे. जिथे संयुक्त राष्ट्र संघटनेनेच हात टेकले तेथे बाकी जगातल्या छोट्या मोठ्या संघटनांचे काय चालणार? जी२०, जी८, नाटो, ब्रिक्स, आसियान, ओपेक अशा वेगवेगळ्या संघटना जगात कार्यरत आहेत; पण या सगळ्या संघटना सध्या या केवळ मूकदर्शक बनून राहिल्या आहेत. त्याचे एक मुख्य कारण असे की या सगळ्या संघटनांवर अमेरिकेचे एकतर्फी वर्चस्व आहे, त्यामुळे अमेरिकेला शहाणपणा शिकवण्याचे धाडस यापैकी कुठल्याही संघटनेत नाही. आंतरराष्ट्रीय न्यायालय यात काही भूमिका बजावू शकते का? याची चाचपणी करण्याची गरज काही जागतिक तज्ज्ञांनी व्यक्त केली होती, पण त्यातूनही ठोस उत्तर मिळत नाही. आता खरं म्हणजे मुख्य मुद्दा असा आहे की जे देश प्रत्यक्ष या युद्धात उतरले आहेत त्यांनासुद्धा हे युद्ध नकोसे झाले आहे. त्यांनाही हे युद्ध जितक्या लवकर थांबेल ते हवे आहे, पण केवळ पहिल्यांदा माघार कोण घेणार या कळीच्या मुद्द्यावर हा संघर्ष येऊन ठेपला आहे. अमेरिका आणि इस्रायल यांनी माघार घेणे अपेक्षित आहे पण त्यातून त्यांच्या इभ्रतीला धक्का पोहोचणार असल्याने माघारीच्या हालचाली त्यांच्याकडून होणार नाहीत. इतके प्रचंड नुकसान सोसल्यानंतर आणि आपल्या देशाच्या सर्वोच्च नेत्याचे या युद्धात बलिदान पडल्यानंतरही इराणची खुमखुमी अजून संपलेली नाही. त्यांनाही हे युद्ध तातडीने बंद झाले तर हवेच आहे, पण इस्रायल पुढे माघार कशी घ्यायची हा त्यांच्या पुढचा प्रश्न आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन, खरं म्हणजे भारतासारख्या एका जबाबदार देशाला मध्यस्थीची चांगली भूमिका बजावण्याची संधी आहे. पण ही संधी साधण्याच्या हालचाली भारतीय नेतृत्वाकडून होताना दिसत नाहीत, किंबहुना आपले कोण ऐकणार अशी साशंकता भारतीय नेतृत्वाच्या मनात निर्माण झालेली दिसते.

# शेतकऱ्यांसह औद्योगिक कंपन्यांना वीजपुरवठ्यासाठी ५ एमव्हीए ट्रान्सफॉर्मर मंजूर

## महावितरणतर्फे जागेची पाहणी; १ कोटी १० लाखांचा निधी मंजूर

प्रतिनिधी । धुळे

**उमाळा– नशिराबाद रोड परिसरातील पीव्हीसी पाईपसह सुमारे २५ औद्योगिक कंपन्यांना गेल्या अनेक वर्षांपासून वारंवार होणाऱ्या वीज खंडित समस्येमुळे कोट्यवधी रुपयांचे नुकसान सहन करावे लागत होते. याबाबत उद्योजकांनी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांची भेट घेऊन समस्या मांडली होती. या मागणीची दखल घेत महावितरणतर्फे शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा तसेच औद्योगिक कंपन्यांसाठी डे–टाइम योजनेंतर्गत ५ एमव्हीए क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर बसविण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यासाठी १ कोटी १० लाख रुपयांचा निधीही मंजूर करण्यात आला आहे.**

बुधवार, दि. १८ मार्च रोजी दुपारी ३.३० वाजता महावितरणचे उपकार्यकारी अभियंता विजय कापूरे व कनिष्ठ अभियंता डी. जी. सावदेकर यांनी चिंचोली येथील उपकेंद्रात जागेची पाहणी करून ट्रान्सफॉर्मर बसविण्याच्या जागेची खुणा केल्या. गुढीपाडव्यापासून प्रत्यक्ष कामास सुरुवात होणार असून एका महिन्यात काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.



### ➤ गुढीपाडव्यापासून कामाचा शुभारंभ होणार

या प्रकल्पासाठी महावितरणचे मुख्य अभियंता आय. ए. मुलाणी, अधीक्षक अभियंता व्ही. एस. पाटील, तसेच कार्यकारी अभियंता डी. एन. साळी (जळगाव) व आर. गोवे यांचे सहकार्य लाभले. सदर कामाचा शुभारंभ गुढीपाडव्यापासून करण्यात येणार आहे. याबद्दल शेतकरी व उद्योजकांनी पालकमंत्री गुलाबराव पाटील तसेच महावितरणचे आभार मानले.

हा ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित झाल्यानंतर उमाळा, धानवड, कंडारी व चिंचोली परिसरातील शेतकऱ्यांना शेती पंपासाठी दिवसा नियमित वीजपुरवठा मिळणार आहे. तसेच उमाळानशिराबाद रोडवरील औद्योगिक कंपन्यांमधील वारंवार होणारे ट्रिपिंग कमी होऊन वीजपुरवठा अधिक स्थिर होण्यास मदत होणार असल्याचे महावितरणचे उपकार्यकारी अभियंता विजय कापूरे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी जळगाव ग्रामीण इंडस्ट्रियल असोसिएशनचे अध्यक्ष सचिन लढ्ढा, तुषार पाटील, महेश पाटील, ललित लढ्ढा तसेच महावितरणचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज सांप्रदायिकांकडून आज शोभायात्रा



प्रतिनिधी । धुळे

जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्रचार्य महाराज सांप्रदायिकांकडून हिंदू नववर्षाच्या स्वागतासाठी धुळे शहरात दि.१९ मार्च रोजी भव्य गुढीपाडवा शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी ३ ते सायंकाळी ६ या वेळेत होणाऱ्या या मिरवणुकीत पारंपरिक उत्साहाचे दर्शन घडणार आहे. या मिरवणुकीची सुरुवात धुळे शहरातील पांझरा नदीकाठावरील स्वामी समर्थ मंदिर येथून होणार असून कालिकामाता मंदिराजवळ सांगता होणार आहे. या शोभायात्रेत धर्मध्वज, गुढ्या, ढोल–ताशे, भजन–कीर्तन तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हिंदू संस्कृतीचा गौरव आणि नववर्षाचे स्वागत उत्साहात साजरे करण्याच्या उद्देशाने ही शोभायात्रा काढण्यात येत असून जिल्ह्यातील भक्त, शिष्य, साधक व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# आरावे विद्यालयात पक्ष्यांसाठी दाणा–पाणी पात्र

प्रतिनिधी । शिंदखेडा

**शिंदखेडा तालुक्यातील सार्वजनिक सेवा मंडळाच्या माध्यमिक विद्यालयात आनंददायी शनिवार अंतर्गत अनोखा उपक्रम राबवण्यात आला.**

वाढत्या उन्हाची चाहूल लक्षात घेता, विद्यार्थ्यांनी टाकाऊ प्लास्टिक बाटल्या आणि डब्यांपासून पक्ष्यांसाठी घरबसल्या दाणा–पाणी पात्रांची निर्मिती केली. उन्हाळ्यात पाण्याचे स्त्रोत आटल्यामुळे मुक्या पक्ष्यांची होणारी हाल थांबवण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने ही पात्रे तयार केली. टाकाऊ वस्तूंना कल्पकतेची जोड देत तयार केलेली ही पात्रे शाळेच्या परिसरात व घराभोवती लावण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. या उपक्रमातून चिमुकल्यांनी मभूतदयेचाफ प्रभावी संदेश दिला आहे. समाजाला विद्यार्थ्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष एस. आर. पाटील, सचिव एस. एस. पाटील आणि खजिनदार व्ही. जी. शिंदे यांनी कौतुक केले. शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या उपक्रमाचे नेटके नियोजन केले होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव जागृत झाल्याचे दिसून आले.

# नाशकात ४ एप्रिलपासून राष्ट्रीय संत संमेलन

प्रतिनिधी । नाशिक

**नाशिकचा आगामी कुंभमेळानिर्विघ्न आणि यशस्वीपणे कसा संपन्न होईल यावर चर्चेसाठीअखिल भारतीय संत समितीतर्फे नाशिकमध्ये येत्या ४ आणि ५ एप्रिलला तपोवनातील श्री स्वामी नारायण मंदिरात राष्ट्रीय संत समेलन होणार आहे सामितीचे राष्ट्रीय महामंत्री स्वामी जितेंद्रानंद सरस्वती यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.**

कुंभमेळयाच्या १३ आखाडयातील प्रत्येक आखाड्याचे दोन प्रतिनिधी, १२७ संप्रदायांचे संत व प्रत्येक राज्यातील पाच ते दहा संत असे तीनशेच्यावर संत उपस्थित राहणार असल्याचे सांगून स्वामी जितेंद्रानंद म्हणाले की,राष्ट्रीय एकता आणि अखंडता हेया संमेलनातील महत्वाचे विषय असतील. संमेलनासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही आमंत्रित करण्यात आले आहे. नाशिक ही तपोभूमी व रामभूमी आहे. नाशिकचा यंदाचा कुंभमेळा हा सर्वाधिक काळ चालणारा कुंभमेळा आहे. त्याचे यशस्वी आयोजन कसे करावे यावर परिषदेत प्रामुख्याने चर्चा होईल. आखातीतील युध्दामुळे जगात अफरा–तफरीचे वातावरण आहे. भारतावर त्याचे परिणाम होत आहेत. जग तिस–या महायुध्दाच्या उंबरठ्यावर आहे.



सर्व जग व मानव जात संकटात आहे. अशावेळी संतांची जबाबदारी वाढली आहे.

या सर्व गोष्टींवर तसेच देशापुढील समस्या, देशाची एकता व अखंडता यावर बैठकीत चर्चा होणार आहे. या संमेलनापूर्वी येत्या ३ एप्रिलला गंगा महासभा समिती नाशिकला येऊन गोदावरीच्या पाण्याचे परिक्षण करणार आहे.

गोदावरी शुध्दीकरणासाठी काय उपाय करता येईल याची सूचना समिती अहवालात करणार आहे. पर्यावरणाच्या नावाखाली काही जण कुंभमेळ्याला लक्ष्य करत आहेत याचा उल्लेख करून स्वामी जितेंद्रनंद सरस्वत्मी म्हणाले की, तपोवनातील झाडे तोडली नाही तर साधु–संत कोठे राहतील ?पर्यावरणप्रेमींनी साधू–संतांबाबत आदराची भावना ठेवावी. तपोवनातील झाडे हटवून दुप्पट झाडे इतरत्र लावावीत.

पुढील १२ वर्षांनी येणा–या कुंभमेळ्यासाठी सरकारने आताच पंधराशे एकर जागा खरेदी करावी यावेळी आचार्य तुषार भोसले,नगरसेवक कैलास मुदलीयार हे उपस्थित होते.

## पान १ वरुन

### दिल्लीत एका इमारतीला आग.....

दिल्ली अग्निशमन दल आणि दिल्ली पोलीस बचावकार्याचे नेतृत्व करत आहेत. या घटनेच्या तपासासाठी दंडाधिकारी चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. प्रशासनाने बचावकार्य तीव्र केले आहे. दिल्ली अग्निशमन दल आणि दिल्ली पोलिसांच्या पथकांनी सूत्रे हाती घेतली आहेत. प्रशासनाने बचावकार्य अधिक तीव्र केले आहे. इमारतीत कोणी अडकले नाही याची खात्री करण्यासाठी अग्निशमन दलाच्या जवानांनी शोधमोहीम सुरू केली आहे.

### आरटीई प्रवेशाचा तिढा सुटला ......

दाखल करण्यात आले होते. त्यानुसार ९ मार्च रोजी उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने या एक किलोमीटरच्या अटीस स्थगिती दिली होती.शासनाने स्वतःहून याबाबत सुधारित आदेश काढायला हवे होते पण शासनाने नकारात्मक भूमिका घेतली होती.दरम्यानच्या काळात तीन किलोमीटर व त्यापुढील अंतराच्या संदर्भात कायदेशीर पर्याय उपलब्ध करून देण्याचा आदेश शासनाला दिला. आता शासनाने एक किलोमीटरवरून तीन किलोमीटर व त्या पुढील अंतरासाठी पालकांना अर्ज करता येईल, असे सांगत माघार घेतली आहे. त्यामुळे आता पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. यामुळे पाच किलोमीटरमधील शाळांसाठी अर्ज करता येणार आहेत.

### आरोग्य विद्यापीठाची.....

तसेच पदव्युत्तर स्तरावर आयुर्वेद आणि युनानी शाखेतील एमडी आणि एमएसच्या अंतिम वर्षांच्या परीक्षा होणार आहेत. विद्यापीठाशी संलग्न असलेल्या इतर अभ्यासक्रमांमध्ये एमबीए (प्रथम सत्र) आणि एमएस्सी फार्मास्युटीकल मेडिसिन (प्रथम सत्र) यांच्या परीक्षाही होणार आहेत. या परीक्षा १० एप्रिलपर्यंत चालणार आहे. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या या परीक्षा राज्यभरातून जवळपास ४३ हजार ९२८ विद्यार्थी देणार आहेत. या परीक्षा राज्यातील एकूण १७५ केंद्रांवर होणार आहेत. दरम्यान, सर्व परीक्षार्थिंनी वेळेचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे. सकाळच्या सत्रासाठी विद्यार्थ्यांनी सकाळी ९ वाजता, तर दुपारच्या सत्रासाठी दुपारी १ वाजता परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. वेळेत उपस्थित न राहिल्यास अडचणी निर्माण होऊ शकतात, त्यामुळे विद्यार्थ्यांनी नियोजनपूर्वक परीक्षा केंद्रावर पोहोचावे, असेही विद्यापीठाने जाहीर केलेल्या परिपत्रकामध्ये नमूद केले आहे.

### ३९ व्या राष्ट्रीय युवा......

स्पर्धांमध्ये २ सुवर्ण पदके; साहित्य विभागातील वाद विवाद आणि वक्तृत्व स्पर्धेत २ सुवर्ण पदके; ललित कला विभागातील स्पर्धेत चिकट चित्रकला आणि रांगोळी स्पर्धेत २ सुवर्ण पदके मिळवली. तर नृत्य विभागातील भारतीय लोक नृत्य स्पर्धेसाठी रौप्य पदकांने सन्मानित करण्यात आले.संगीत विभागातील भारतीय समूह गायन, नृत्य विभागातील सर्जनशील नृत्य आणि ललित कला विभागातील माती शिल्प काम या तिन्ही स्पर्धांमध्ये ३ उत्तेजनार्थ पारितोषिके मिळवली. विशेष म्हणजे सहभागी १४१ विद्यापीठांनी सादर केलेल्या शोभायात्रा स्पर्धेमध्ये मुंबई विद्यापीठास सुवर्ण पदकाने सन्मानित करण्यात आले. ललितकला स्पर्धेत विजेतेपदाचा तर साहित्य स्पर्धेत तृतीय क्रमांकाचा बहुमान विद्यापीठाला मिळाला. हा राष्ट्रीय युवा महोत्सव दोन फेऱ्यांमध्ये आयोजित केला जातो. स्पर्धेची प्राथमिक फेरी संपूर्ण देशात आठ क्षेत्रीय विभागात आयोजित केली जाते. या प्रत्येक क्षेत्रीय विभागातील प्रत्येक स्पर्धेच्या प्रथम, द्वितीय आणि तृतीय पारितोषिक विजेत्यांना अंतिम फेरीत सहभागी होता येते.

# मेहरुण परिसरात महाराजस्व समाधान शिबीर उत्साहात

## भटक्या–विमुक्त बांधवांना प्रमाणपत्रे, योजनांचा लाभ!

प्रतिनिधी । जळगाव

**शासनाच्या आदेशानुसार जळगाव जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली मेहरुण परिसरातील एल.एच. पाटील शाळेत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर तसेच विमुक्त जाती व भटक्या जमातींसाठी ओळखपत्र, प्रमाणपत्र व विविध योजना लाभ मोहिमेअंतर्गत विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**




मेहरुण तलावाजवळील वस्तीतील नागरिकांना आवश्यक शासकीय कागदपत्रे सहज उपलब्ध व्हावीत आणि विविध योजनांचा लाभ मिळावा, या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिराच्या प्रास्ताविकात जळगावचे प्रांताधिकारी विनय गोसावी यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, प्रशासन नागरिकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर असून शासनाच्या या उपक्रमामुळे गरजू नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. शिबिरात विविध प्रकारचे दाखले व प्रमाणपत्रे देण्यात येणार असून काही त्रुटी राहिल्यास पुन्हा शिबिर आयोजित करण्यात येईल, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी संजय गांधी निराधार योजनेच्या तहसीलदार रुपाली काळे यांनी माहिती देताना सांगितले की, निराधार महिलांना शासनाकडून दरमहा १५०० रुपये व दिव्यांग निराधारांना २५०० रुपये अनुदान दिले जाते. पात्र महिलांनी या शिबिरात नोंदणी करण्याचे आवाहन त्यांनी केले. या शिबिरात सुमारे ३६ कुटुंबांनी सहभाग नोंदविला. विविध १० कक्षांच्या माध्यमातून नागरिकांना मार्गदर्शन व आवश्यक सहकार्य करण्यात आले. तसेच तलाठी, मनपा आरोग्य अधिकारी, संबंधित विभागाचे अधिकारी व अनुलोम संस्थेचे सदस्य उपस्थित होते.

# शासकीय किंमतीपेक्षा नऊपट वाळूची अधिकची बोली

प्रतिनिधी । नंदुरबार

**नंदुरबार जिल्ह्यातील वाळू घाट लिलावात अमळथे घाटाला शासकीय किमतीपेक्षा नऊपट अधिकची बोली लागली आहे. ४९६१ ब्रास वाळूसाठी तब्बल २.४८ कोटींची बोली लागल्याने, यामागे अवैध उपशाचे गणित दडल्याची चर्चा सुरू झाली आहे.**

नंदुरबार जिल्ह्यातील वाळू ठिय्यांच्या लागलेल्या बोलीत अमळथे येथील वाळू घाटाला शासनाच्या मूलभूत किमतीपेक्षा तब्बल नऊ पट अधिकची बोली लागली असून दोंदवाडच्या वाळू घाटाला देखील साडेतीन पट अधिकची बोली लागली आहे. जिल्ह्यात साडेतीन हजार ब्रासने घरपोच वाळू मिळत असतांना अमळथे येथील वाळूच्या घाटाला लागलेली बोली पाहता जागेवरच हा वाळूचा भाव ब्रासला पाच हजारांहुन अधिकचा असणार आहे. त्यामुळे नऊपट अधिकची किंमत मिळालेल्या अमळथे घाटात दडलय तरी काय, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

अनेक वर्षांनंतर जिल्ह्यातील आठ वाळू घांटांचा लिलाव काढण्यात आला आहे. लिलावात सात घाटांना शासनाने निर्धारीत केलेल्या मूलभूत किमतीपेक्षा जास्तीची बोली मिळाली आहे. जिल्ह्यात प्रशासनाने सध्या नंदुरबार तालुक्यातील आराळे, ओसर्ली, अमळथे आणि बोराळे तर शहादा तालुक्यातील दोंदवाडे, ससदे, कवथळ तसा आणि फेस अशा आठ वाळू घाटांचा लिलाव काढला होता. मात्र ओसर्ली येथे आलेल्या तीन निविदा धारकांपैकी एकाच्या कागदपत्रात त्रुटी निघाल्याने दोनच निविदाधारक राहिल्याने ओसर्लीच्या वाळू घाटाचा लिलाव पुढे ढकलण्यात आला. सोमवारी उर्वरित आठ घाटांना बोली लागली. यात अमळथे वाळू घाटातून ४९६१ ब्रास वाळूचा लिलाव करण्यात आला असून याचे निर्धारीत मूल्य हे २६ लाख ७८हजार ९४० रुपये इतके ठेवले होते.

मात्र या घाटाला तब्बल नऊ पट अधिकची बोली लागली असून ४९६१ ब्रास वाळूसाठी २ कोटी ४८ लाख ३४ हजार ४४४ रुपयांची बोली मिळाली आहे. त्यामुळे या घाटातील एका ब्रास वाळूसाठी बोलीदाराला तब्बल पाच हजारांहून अधिकची किंमत मोजावी लागली.

**चोपडा नगरपरिषद, चोपडा जिल्हा जळगांव**

**CHOPDA MUNICPAL COUNCIL, CHOPDA, DIST. JALGAON - 425107**
Ph. (02586) 220016 Toll Free No.: 1800 233 5251 Fax: 220702
e-mail: co.mcchopda@gmail.com

जा.क्र.२०२६-२०२७/भांडार/कार्या. क्र २५ — दि. १८/०३/२०२६

**जाहीर ई-निविदा सूचना**

सन २०२६–२०२७ या वित्तीय वर्षाकरीता चोपडा नगरपरिषद कार्यालयाचे भांडार विभागमार्फत खालीलप्रमाणे कामाचे ई–निविदा मागविण्यात येत आहे,

**कामाचे नांव–**

१. सन २०२६–२०२७ या आर्थिक वर्षासाठी कार्यालयीन नमुने छपाई करणेसाठी वार्षिक दरकरार करणेबाबत.

२. सन २०२६–२०२७ या आर्थिक वर्षासाठी कार्यालयीन नमुने स्टेशनरी साहित्य खरेदी करणेसाठी वार्षिक दर करार करणेबाबत.

तरी इच्छुकांनी आपले दर ऑनलाईन पध्दतीने दि. २७/०३/२०२६ पर्यंत दाखल करावे. तरी याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

इच्छुक मक्तेदार यांना सदर ई–निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुनच दाखल करता येईल. निविदा संबंधी माहिती व अटी–शर्ती सदर संकेतस्थळावरुन पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

सही/-
X-X-X
**रामनिवास झंवर**
**मुख्याधिकारी**
**चोपडा नगरपरिषद, चोपडा**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.– ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✻ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी** (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# गोलाणी मार्केटमध्ये घाणीचे साम्राज्य

## महापालिकेच्या हाकेच्या अंतरावर स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर; स्वच्छतेअभावी व्यापारी संतप्त

**प्रतिनिधी । जळगाव**

शहरातील मध्यवर्ती व गजबजलेल्या व्यापारी भागांपैकी एक असलेल्या गोलाणी व्यापारी मार्केटमध्ये सध्या घाणीचे साम्राज्य पसरले असून स्वच्छतेच्या अभावामुळे व्यापारी व ग्राहक त्रस्त झाले आहेत. विशेषतः मार्केटच्या तिसऱ्या विंगमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा साचल्याने त्या परिसराचे रूपांतर जणू डंपिंग ग्राऊंडमध्ये झाले आहे. परिणामी परिसरात दुर्गंधी पसरत असून आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

गोलाणी मार्केट हे जळगाव शहरातील महत्त्वाचे व्यापारी केंद्र आहे. येथे दररोज हजारो ग्राहकांची वर्दळ असते. मोबाईल, भाजीपाला, फळे तसेच विविध किरकोळ वस्तूंच्या खरेदीसाठी नागरिक मोठ्या प्रमाणात येथे येत असतात. मात्र, स्वच्छतेच्या अभावामुळे या गजबजलेल्या परिसरात सडलेला कचरा, प्लास्टिक पिशव्या आणि टाकाऊ वस्तूंचे ढिगारे रस्त्याच्या कडेला पडलेले दिसून येतात. त्यामुळे व्यापाऱ्यांसह



ग्राहकांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. दरम्यान, अलीकडेच नवनियुक्त महापौर दीपमाला काळे यांनी शहरातील महामार्ग परिसरात स्वतः उपस्थित राहून स्वच्छता मोहीम राबविली होती. तसेच शहरातील विविध मार्केट परिसरात साफ सफाई करून घेण्याचे निर्देशही त्यांनी दिले होते. त्यांच्या या उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागतही करण्यात आले. मात्र, महापालिकेला लागूनच असलेल्या आणि हाकेच्या अंतरावर असलेल्या गोलाणी मार्केटकडे अद्यापही दुर्लक्ष होत असल्याने

### ➤ कचऱ्याची विल्हेवाट लावावी

काही व्यापाऱ्यांनी सांगितले की, कचरा वेळेवर उचलला जात नसल्यामुळे ही समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. महापालिकेपासून अवघ्या काही अंतरावर असलेल्या या महत्त्वाच्या मार्केटमध्ये स्वच्छतेची अशी दयनीय अवस्था असल्याने व्यापारी वर्ग संतप्त झाला आहे. प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन गोलाणी मार्केटमध्ये स्वच्छता मोहीम राबवावी, कचऱ्याची नियमित विल्हेवाट लावावी आणि परिसर कायमस्वरूपी स्वच्छ ठेवण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी व्यापारी व नागरिकांकडून जोर धरत आहे.

व्यापारी वर्गात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विशेषतः मार्केटच्या तिसऱ्या विंगमध्ये कचऱ्याचे ढिगारे साचल्याने परिसरात माश्या व डासांची संख्या वाढली आहे. त्यामुळे व्यापारी दिवसभर दुर्गंधीच्या वातावरणात व्यवसाय करीत असल्याची तक्रार करीत आहेत.

# मुद्रांक किंमतीपेक्षा जास्त रक्कम घेणारा विक्रेता एसीबीच्या जाळ्यात




**प्रतिनिधी । पाचोरा**

**मुद्रांक स्टॅम्प पेपर किमतीपेक्षा जास्त रक्कम घेणे मुद्रांक विक्रेत्याच्या अंगलट आले पाचोरा येथील मुद्रांक विक्रेता व त्याचे झेरॉक्स दुकानावर असलेल्या भावाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने तक्रारदाराच्या तक्रारीनुसार सापळा रचून मुद्रांक पेपर च्या किमतीपेक्षा जास्त रक्कम घेत असताना रंगेहाथ पकडले.**

याबाबत पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहिती अशी की, मुद्रांक विक्रेता योगेश ईश्वरलाल संघवी (वय ४९, रा. पाचोरा) हे त्यांच्या जैन पाठ शाळेजवळील प्रशांत झेरॉक्स दुकानात मुद्रांक विक्रीचा व्यवसाय करतात. दि १५ मार्च रोजी तक्रारदार यांना ५ हजार किंमतीचे रु. ५०० दराचे १० स्टॅम्प पेपर बँकेच्या कामासाठी घेणे होते. त्यांनी मुद्रांक विक्रेता योगेश संघवी यांस स्टॅम्प पेपर मागितले. योगेश संघवी यांनी पाच हजार स्टॅम्प पेपरसाठी ५०० रुपये वर द्यावे लागतील; अन्यथा स्टॅम्प मिळणार नाही व यात काही कमी होणार नाही, असे सांगून त्यासाठी आधारकार्ड घेऊन येण्याची सूचना केली.तक्रारदार यांनी एव्हढे पैसे देणार नाही, असे सांगितल्यावर स्टॅम्प पेपर मिळणार नाही, असे मुद्रांक विक्रेत्याने सांगितले.तक्रारदार यांनी आधारकार्ड घेऊन येतो, असे सांगून घरी गेले. व त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कार्यालयात तक्रार केली.लाचलुचपत विभागाच्या पथकाने दि. १७ रोजी सापळा रचून प्रशांत झेरॉक्स येथे तक्रारदारास विशिष्ट नोटा देऊन स्टॅम्प मागितले. त्यावेळी मुद्रांक विक्रेत्यांचा भाऊ प्रशांत ईश्वरलाल संघवी यांनी मुद्रांक देऊन रु ५५०० रुपयांची रक्कम स्वीकारली. यात ५०० रुपये जास्त घेऊन मुद्रांक देताच पथकाने प्रशांत ईश्वरलाल संघवी या खाजगी इसमाला रंगेहाथ पकडले. यावेळी मुद्रांक विक्रेता योगेश संघवी हा देखील दुकानात आला. त्यांनी जास्त रकमेची मागणी केली व प्रशांत याने रक्कम स्वीकारली म्हणून लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने रंगेहाथ अटक केली. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक पथकाचे पोलिस निरीक्षक योगेश ठाकूर, तपासधिकारी पोलीस कॉन्स्टेबल हेमंत नगरे, बाळू मराठे, पोलिस स्मिता नवघरे यांच्या पथकाने केली.

# अमृत योजनेंतर्गत दिल्ली येथे पाचोरा बचतगटांचा गौरव

**प्रतिनिधी । पाचोरा**

**पाचोरा शहरात राज्य व केंद्र सरकारच्या विविध योजनांतर्गत असलेली कामे पाचोरा शहर व ग्रामीण भागातील महिला बचत गटांच्या वतीने राबविण्याचे कार्य उल्लेखनीय आणि गौरवास्पद आहे. देश भरातील महिला बचतगटांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करुन सन्मानित करण्यात आले.**

केंद्र सरकारच्या अमृत योजनेंतर्गत वूमन फॉर ट्रीजमध्ये सहभागी महिला बचत गटांचा गौरव करण्यासाठी नवी दिल्ली येथील भारत मंडप येथे दि.१३



मार्च रोजी अमृत मित्र महोत्सव हा कार्यक्रम अध्यक्ष केंद्रीय शहरी विकास मंत्री मनोहरलाल खट्टर यांच्या अध्यक्षतेत तर शहरी विकास खात्याचे सचिव, सहसचिव व इतर अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमास देशभरातील ३० राज्यांमधून महिला बचतगटांचे प्रतिनिधी उपस्थित होते. विशेष म्हणजे एका नगरपरिषदेचे सर्वात जास्त प्रतिनिधी म्हणून पाचोरा शहरातून ८० महिला बचतगट प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला. या कार्यक्रमात अमृत योजनाविषयीच्या चर्चासत्रात पाचोरा नगरपालिकेचे कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी मंगेश देवरे यांना संधी देण्यात आली होती. त्या चर्चेत देवरे यांनी पाचोरा शहरात महिला बचतगटांमार्फत केलेल्या वृक्षारोपण कामाची माहिती दिली. शहरात ओपन स्पेस सुव्यवस्थित असल्याने वृक्षलागवड करणे शक्य झाले. महिला बचतगटांना नगरपालिका क्षेत्रात अधिकाधिक कामे मिळण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षणाची गरज असल्याचे नमूद केले. या कार्यक्रमामुळे बचतगटांचा उत्साह वाढणार असून आगामी काळात अधिकाधिक कामे करण्यास महिला सक्षम होतील. सदर कार्यक्रमास महिला बचत गटांसोबत जिल्हा सहआयुक्त जनार्दन पवार, मुख्याधिकारी मंगेश देवरे, उपमुख्याधिकारी दुर्गेश सोनवणे, कर अधीक्षक दगडू मराठे, शहर अभियान व्यवस्थापक अर्जुन भोळे, पाणीपुरवठा अभियंता श्रुतिका धात्रक, भंडारपाल प्रगती खडसे, समूह संघटक कुणाल तायडे उपस्थित होते.

## थोडक्यात

### बोदवड तालुक्यात पोटहिस्सा मोजणी

**जळगाव ।** राज्यातील जमिनीच्या नकाशे व ७/१२ अधिकार अभिलेख यामधील विसंगती दूर करण्यासाठी केंद्र शासनाच्या विशेष सहाय्य योजना २०२४-२५ अंतर्गत पोटहिस्सा मोजणी व नकाशे अद्ययावत करण्याचा पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी राज्यातील प्रत्येक महसूल विभागातून तीन तालुक्यांची निवड करण्यात आली असून एकूण १८ तालुक्यांमध्ये हा उपक्रम राबविला जाणार आहे. या अंतर्गत बोदवड तालुक्यातील गोळेगाव खुर्द, गोळेगाव बुद्रूक, पाचदेवळी, करंजी व भानखेडा या पाच गावांची सुरुवातीला निवड केली आहे. या गावांमध्ये सुरुवातीच्या टप्प्यात जमिनीच्या पोटहिस्स्यांची मोजणी करून नकाशे अद्ययावत करण्याचे काम हाती घेतले जाईल. या उपक्रमामुळे नकाशे व ७/१२ अधिकार अभिलेखातील तफावत दूर होऊन जमिनीच्या हद्दी व क्षेत्राबाबतचे वाद कमी होईल.

### मनसे उपमहानगर अध्यक्षपदी आशुतोष जाधव

**जळगाव ।** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत आशुतोष जाधव यांची उपमहानगर अध्यक्षपदी नियुक्ती जळगाव महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या जळगाव शहर संघटनेत महत्त्वाची नियुक्ती केली असून आशुतोष जाधव यांची जळगाव शहर उपमहानगर अध्यक्ष पदावर नियुक्ती केली आहे. ही नियुक्ती मनसेचे नेते अॅड.जयप्रकाश बाविस्कर यांनी जाहीर केली. यावेळी जिल्हाध्यक्ष अॅड.जमील देशपांडे, महानगराध्यक्ष विनोद शिंदे, उपमहानगराध्यक्ष श्रीकृष्ण मेंगडे, ललित शर्मा, विभाग अध्यक्ष राहुल चव्हाण, खुशाल ठाकूर आदी उपस्थित होते. जाधव यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देत, संघटना बळकट करण्यासाठी सक्रियपणे काम करण्याचे आवाहन केले.

# स्थानिक गुन्हे शाखेकडून सराईत दुचाकी चोरटा जेरबंद; १० मोटारसायकली जप्त



**प्रतिनिधी । जळगाव**

**शहरातील वाढत्या दुचाकी चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी यांनी दिलेल्या आदेशानुसार, स्थानिक गुन्हे शाखेने धडाकेबाज कामगिरी केली आहे. या कारवाईत एका सराईत चोरट्याला अटक करण्यात आली असून, त्याच्याकडून ३ लाख १० हजार रुपये किमतीच्या एकूण १० मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत.**

दि. २७ फेब्रुवारी रोजी जळगाव शहरातील भानू हॉटेल परिसरातून कल्पेश ज्ञानेश्वर चौधरी यांची हिरो स्प्लेंडर (एमएच १९ बीवाय ७४१३) चोरीला गेली होती. याप्रकरणी शनिपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आला होता.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, नशिराबाद येथील ताज नगरमधील रहिवासी समीर शेख शफीक शेख (वय २० वर्षे) याला संशयावरून ताब्यात घेण्यात आले. त्याची कसून चौकशी केली असता, त्याने जळगाव शहर, एमआयडीसी, जिल्हापेठ आणि चक्क मध्य प्रदेशातील बुऱ्हाणपूर येथूनही मोटारसायकली चोरल्याची त्याने कबुली दिली आहे.

# लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला

**जळगाव ।** जुन्या वादाची खुन्नस मनात धरून तालुक्यातील आसोदा येथे एका कुटुंबावर जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे. याबाबत सलीम शेख, मुस्ताक शेख, सलीम शेख (दुसरा), मेहमूद शेख, शेख निमनु शेख, शहबाज शेख आणि रियाज मुनाफ शेख (सर्व रा.आसोदा) यांच्यांविरुद्ध जळगाव तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जिल्ह्यातील एक हजारांवर शिक्षकांवर कारवाईची टांगती तलवार!

**प्रतिनिधी । जळगाव**

**बोगस शालार्थ आयडी प्रकरणात जळगाव जिल्ह्यातील एक हजारावर शिक्षकांवर कारवाईची शक्यता आहे. प्रथमच एसआयटीमार्फत शिक्षकांच्या नावाची यादी तयार करण्यात आली आहे. या यादीत जळगावमधील तब्बल १००४ शिक्षकांचा समावेश असून हा आकडा तिपटीने वाढण्याची शक्यता वर्तविली आहे. यात तत्कालीन शिक्षणाधिकारी नितीन बच्छाव आणि उपसंचालक बी. बी. चव्हाण यांच्या शेऱ्याने या शिक्षकांची नियुक्ती झाल्याने ही नियुक्ती सदोष असल्याचे स्पष्ट आहे.**

राज्यभरात गाजत असलेल्या बोगस

### बोगस शालार्थ आयडीप्रकरण

शालार्थ आयडीप्रकरणी सुरुवातीला नाशिकच्या तत्कालीन शिक्षण उपसंचालक भाऊसाहेब चव्हाण यांनी भद्रकाली पोलिस ठाण्यात पहिला गुन्हा नोंदवला होता. त्यानंतर दोन वर्षात झालेल्या तपासात जिल्हा परिषदेसह महानगरपालिकेच्या अनेक शिक्षण अधिकाऱ्यांसह संस्थाचालकही यात रडारवर आले. या प्रकरणातील बहुतांश संबंधितांवर कायदेशीर कारवाईही करण्यात आली. फिर्यादी असलेल्या भाऊसाहेब चव्हाण यांच्यावरही याप्रकरणी गुन्हा दाखल असून याप्रकरणात जळगाव जिल्ह्यातील सुरू असलेल्या तपासाअंती अधिकारी आणि शिक्षणसंस्थांसह तब्बल १००८ शिक्षकांच्या नावांची यादी नाशिकच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे सुपूर्द करण्यात आली आहे. जळगावमधील ३५ पेक्षा अधिक संस्थांचा समावेश असून यांची नियुक्ती करताना नितीन बच्छाव आणि बी.बी.चव्हाण यांचीच स्वाक्षरी असल्याचे नमूद आहे. काही प्रकरणांत संभाजीनगर शिक्षण उपसंचालकांकडून कागदपत्रांची तपासणी करण्याचा शेराही मारण्यात आलेला आहे. तपासणी अहवालात विविध शैक्षणिक संस्थांमधील नियुक्ती आदेश, शालार्थ ड्राफ्ट, कागदपत्रे व संबंधित नोंदींची पडताळणी करण्यात आली. या पडताळणीत अनेक ठिकाणी नोंदी अपूर्ण आहेत.

# माणुसकी हाच खरा धर्म : तहसीलदार बनसोडे

**प्रतिनिधी । पाचोरा**

**शहरातील जामनेर रोडवरील बहीरमनगर परिसरातील प्रसिद्ध श्री भैरवनाथ मंदिरात पापमोचनी एकादशीच्या औचित्याने धार्मिक परंपरेला साजेसा उपक्रम राबविण्यात आला. माणुसकी हाच खरा धर्म आहे,असे प्रतिपादन तहसीलदार विजय बनसोडे यांनी केले.**

हिंदू धर्मपरंपरेनुसार एकादशीच्या दिवशी भात व अन्नधान्याचे सेवन वर्ज्य मानले जाते. या धार्मिक संकेतांचा आदर राखत बहीरमनगर येथील भैरवनाथ मित्र मंडळातर्फे साबुदाणा खिचडीचे आयोजन करण्यात आले होते. सकाळपासून मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. अनेक भाविकांनी श्री भैरवनाथांचे दर्शन घेत भक्तिभावाने फराळाचा लाभ घेतला. या प्रसंगी पाचोरा तहसीलदार विजय बनसोडे यांनी श्री भैरवनाथांचे दर्शन घेतले तसेच भाविकां सोबत साबुदाण्याच्या फराळाचा आस्वाद घेतला. भैरवनाथ मित्र परिवाराशी संवाद साधताना सांगितले की, मी तहसीलदारच्या खुर्चीवर बसलो तेव्हाच तहसीलदार असतो, पण येथे मी देवाच्या चरणी सर्वसामान्य माणूस आहे. जातभेद मी मानत नाही, माणुसकी हाच खरा धर्म आहे. त्यांच्या या विचारांचे उपस्थित भाविकांनी स्वागत केले. मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की,



दर रविवारी मंदिरात भक्तांसाठी प्रसादाचे वाटप केले जाते आणि समाजात धार्मिक परंपरा जपत भक्तांमध्ये ऐक्य व भक्तिभाव वाढविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सातत्याने राबविला जात आहे. पापमोचनी एकादशीच्या निमित्ताने मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. भाविकांनीही या उपक्रमाचे स्वागत करत मंडळाच्या कार्याचे कौतुक केले. भक्तांसाठी साबुदाणा खिचडीचा प्रसाद देण्यात येईल, अशी माहिती भैरवनाथ मित्र मंडळाच्यावतीने देण्यात आली.

# पाचोरा विधानसभा मतदारसंघात लवकरच मतदार यादी पुनर्परीक्षण

## प्रांताधिकारी भूषण अहिरे यांचे पत्रकार परिषदेतून मतदारांना आवाहन

**प्रतिनिधी । पाचोरा**

**भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानानुसार लवकरच मतदार यादीचे विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम सुरू होणार आहे त्यासाठी आपल्या गावातील मतदार यादीचे पुनरीक्षण पुर्व तयारी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्यामार्फत पुनर्परीक्षण सुरू आहे, अशी माहिती मतदार नोंदणी अधिकारी तथा पाचोरा उपविभागीय अधिकारी भूषण अहिरे यांनी दिली.**

सन वर्ष २०२४ च्या मतदार यादीत नाव असलेल्या आणि वर्ष २००२ च्या




मतदार यादीतही नाव असलेल्या मतदारांचे मॅपिंग बीएलओमार्फत केले जात आहे.

ज्या मतदारांचे वर्ष २०२४ च्या यादीत नाव आहे. पण वर्ष २००२ च्या यादीत नाव नाही, अशा मतदारांनी आपल्या आई वडील किंवा आजी-आजोबा यांचेच वर्ष २००२ यादीतील विधानसभा क्रमांक व यादी भाग क्रमांक व अनुक्रमांक ही माहिती शोधून संबंधित बीएलओ यांना द्यावी. जर स्वतःचे किंवा आई-वडील किंवा आजी-आजोबा यांचे नाव वर्ष २००२ च्या मतदार यादीत नसेल तर सखोल पुनरिक्षण कार्यक्रम जेव्हा सुरू होईल तेव्हा बीएलओंकडून ईनुम्रेशन फॉर्म दिला जाईल, हा फॉर्म अचूक भरून आवश्यक कागदपत्रासह बीएलओंकडे जमा करावा लागेल, असेही त्यांनी सांगितले.

### • बीएलओंशी संपर्क करावा

सर्व मतदारांनी आवश्यक माहिती त्वरित संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना देऊन सहकार्य करावे. माहिती वेळेत न दिल्यास विशेष सखोल पुनरीक्षणानंतर आपले नाव मतदार यादीतून वगळले जाण्याची शक्यता आहे आणि या बाबीस संबंधित मतदार स्वतः जबाबदार राहील. अधिक माहितीसाठी आपल्या भागातील बीएलओ यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन प्रांताधिकारी अहिरे यांनी पत्रकार परिषदेतून केले.

# गुढीपाडव्यानिमित्त चैत्र पालवी स्वरोत्सव मैफल

**प्रतिनिधी । जळगाव**

**चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढी पाडवा. साडेतीन मुहूर्तांपैकी एक शुभ मुहूर्त. नवीन मराठी वर्षाचा प्रारंभ दिन. या मंगल दिनाचे स्वागत स्व. वसंतराव चांदोरकर स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने प्रात:कालीन सुगम संगीताच्या मैफिलींचे अर्थात चैत्र पालवी स्वरोत्सवाने करणार आहोत. हा कार्यक्रम दि. १९ मार्च रोजी सकाळी ६ वाजता महात्मा गांधी उद्यानात संपन्न होणार आहे.**

या कार्यक्रमास भवरलाल अँड कांताबाई जैन फाऊंडेशनचे सहकार्य लाभले आहे. कार्यक्रमासाठी आ.राजुमामा भोळे, महापौर दीपमाला काळे, जिल्हाधिकारी रोहन घुगे, जैन इरिगेशन सिस्टिम्सचे अध्यक्ष अशोक जैन यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या स्वरोत्सवात श्रुती जोशी, वरुण नेवे, राजेश्वरी रत्नपारखी (बासरी) आपली कला सादर करणार आहे.तर राजेंद्र माने संवादीवर व राहुल कासार तबल्यावर संगत करणार आहे. या प्रात:कालीन मैफिलीचे निवेदन प्रिती झारे करणार आहेत. या कार्यक्रमाचा लाभ रसिकांनी घ्यावा, असे आवाहन चांदोरकर प्रतिष्ठान, भवरलाल व कांताबाई जैन फाऊंडेशनने केले आहे.

# चोपडा नगरपालिका कामगारांचे कामबंद आंदोलन मागे

## कंत्राटी कामगारांच्या थकीत वेतनाचा प्रश्न अखेर मार्गी लागल्याने आंदोलन घेतले मागे

प्रतिनिधी । चोपडा

**येथील नगरपरिषदेत कंत्राटी (आऊटसोर्सिंग) कामगारांचे थकीत वेतनाचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. त्यामुळे कामगारांनी दिलेला ङ्कामबंदफ आंदोलनाचा इशारा मागे घेतला असून शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता यांसारख्या अत्यावश्यक सेवा सुरळीत राहणार आहेत**



गेल्या ४ महिन्यांपासून वेतन न मिळाल्यामुळे कामगारांमध्ये नाराजी होती. ही परिस्थिती लक्षात घेऊन आमदार प्रा.चंद्रकांत सोनवणे यांनी वेतनाचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार नगराध्यक्षा नम्रता सचिन पाटील, मुख्याधिकारी रामनिवास झंवर तसेच नगरसेवकांनी तत्काळ पुढाकार घेत ठेकेदाराशी चर्चा केली. नगरपरिषदेकडून ठेकेदाराला ३ महिन्यांचे बिल अदा करून कामगारांचे वेतन तत्काळ देण्याचे आदेश देण्यात आले. या निर्णयामुळे कामगारांना दिलासा मिळाला आहे. त्यामुळे त्यांनी आंदोलन मागे घेत पुन्हा कामावर रुजू होण्याचा निर्णय घेतला आहे. यावेळी बांधकाम सभापती हुसेन खान पठाण, स्वच्छता सभापती रमेश शिंदे तसेच इतर नगरसेवकांनी कामगारांशी संवाद साधून परिस्थिती शांततेत सोडवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. नगराध्यक्षा नम्रतापाटील, मुख्याधिकारी रामनिवास झंवर व नगरसेवकांनी सांगितले की, पाणीपुरवठा व स्वच्छता या सेवा शहरासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. कामगारांच्या अडचणी समजून घेत त्यांना न्याय देणे ही आमची जबाबदारी आहे. प्रशासनावर दाखवलेला कामगारांचा विश्वास आम्ही कायम ठेवू. या सकारात्मक निर्णयामुळे शहरातील नागरिकांना कोणताही त्रास न होता सेवा सुरळीत सुरू राहणार आहे.

# चोपड्यात एकाच दिवसात ३ घरफोड्या ४ लाख ८६ हजारांचा ऐवज चोरी

प्रतिनिधी । चोपडा



**शहरातील अशोक नगर,तारामती नगर आणि इंदिरा नगर भागात बंद घरांचे कुलूप तोडून तब्बल चार लाख ८६ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरी झाल्याची घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.**

याप्रकरणी चोपडा शहर पोलीस स्टेशनमध्ये अज्ञात चोरट्यांविरुद्ध फिर्यादी अनिताबाई ईश्वर धनगर (४९, रा. अशोक नगर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्या १५ मार्च २०२६ रोजी सकाळी आठ वाजेच्या सुमारास घराला कुलूप लावून बाहेर गेल्यानंतर अज्ञात चोरट्याने त्यांच्या बंद घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. चोरट्याने घरातील कपाटातून सोने, चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण चार लाख ८६ हजारांचा ऐवज चोरून नेला. तसेच परिसरातील तारामती नगर आणि इंदिरा नगर भागातील इतर बंद घरांनाही चोरट्यांनी लक्ष्य केले. घरफोडीची माहिती मिळताच चोपडा शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. अनिताबाई धनगर यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. तपास पोलीस निरीक्षक मधुकर साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक चेतन परदेशी करत आहेत. भरवस्तीत झालेल्या या मोठ्या चोरीमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## थोडक्यात

### भादली स्टेशननजीक अज्ञात इसमाचा मृत्यू

**भुसावळ ।** भुसावळ रेल्वे विभागातील भादली रेल्वे स्टेशनजवळ ३५ वर्षीय इसमाचा रेल्वेच्या धक्क्याने जखमी होवून मृत्यु झाल्याची घटना १२ मार्च रोजी घडली. याबाबत भुसावळ लोहमार्ग पोलिस ठाण्यात २२/२०२६ प्रमाणे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मृताची उंची ५ फुट ७ इंच, रंग निमगोरा, डोक्याचे केस काळे साधारण वाढलेले, चेहरा लांबट, दाढी मिशी काळी वाढलेली, नाक सरळ तसेच अंगात फुलबाहीचे हिरव्या रंगाचे शर्ट पांढऱ्या रंगाचा बनियन, निळ्या रंगाची पॅन्ट, काळया रंगाची अंडरवियर अशा वर्णनाचा आहे. मृताची ओळख अद्याप पटलेली नाही. या इसमाबाबत माहिती असल्यास रेल्वे पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांतर्फे करण्यात आले आहे.

### किरकोळ वादातून एकास मारहाण

**जळगाव ।** जुन्या वादाची खुन्नस नात धरून आणि किरकोळ शिवीगाळचे निमित्त साधून आसोदा येथे एका कुटुंबावर जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे. तालुक्यातील आसोदा येथील रहिवाशी अमजद समद शेख (वय ४२) हे १५ मार्च रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास आपल्या घरासमोर असताना, आरोपींनी जुन्या वादातून त्यांना गाठले. बेकायदेशीर मंडळी जमवून आलेल्या ७ जणांनी फिर्यादीला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर अमजद शेख यांच्या डोक्यावर लोखंडी रॉड टाकून गंभीर दुखापत केली. तसेच त्यांची पत्नी व भावाला देखील लाकडी काठ्यांनी व बुक्क्यांनी मारहाण केली.

# साकरेचे सरपंच शरद पाटील यांची शेतकी संघाच्या चेअरमनपदी निवड



प्रतिनिधी । धरणगाव

**तालुक्यातील साकरे गावाचे कार्यतत्पर सरपंच शरद पाटील यांची धरणगाव-एरंडोल शेतकी संघाच्या चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. त्यांच्या निवडीमुळे परिसरातील शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांच्या नेतृत्वाकडून मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत.**

या सत्कार सोहळ्यास भाजपचे ज्येष्ठ नेते चंदनराव पाटील, नगरसेवक गुलाब मराठे, संभाजीराव सोनवणे, भैया मराठे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी शरद पाटील यांचा पुष्पगुच्छ व शाल देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी मनोगत व्यक्त करताना चंदनराव पाटील यांनी सांगितले की, चेअरमनपद ही मोठी जबाबदारी असून शरद पाटील यांनी ती प्रामाणिकपणे पार पाडावी. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेत त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच त्यांच्या कार्यातून शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.शरद पाटील यांनीही आपल्या मनोगतात सर्वांचे आभार मानत शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाला स्थानिक नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली होती.

**शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध**

**चेअरमनपदी निवड झाल्याने शरद पाटील यांच्या सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी शरद पाटील यांनी आपल्या मनोगतात आधी निवड प्रक्रियेत सहभागी सभासदासह कार्यकर्त्यांचे तसेच उपस्थित सर्वांचे आभार मानत शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे सांगितले.**

# साकेगावात हिंदू बांधवांनी केले इफ्तार पार्टीचे आयोजन

प्रतिनिधी । भुसावळ

**तालुक्यातील साकेगावात हिंदू बांधवांनी एकात्मतेचे दर्शन घडवत मुस्लिम बांधवांना पवित्र रमजाननिमित्त इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते, याकरिता मॉर्निंग सीसी ग्रुपतर्फे डॉ. कैलास ठाकरे, अजय चौधरी, राहुल चौधरी आदींनी पुढाकार घेतला होता.**



साकेगावात ३२ जाती धर्माचे लोक गुणगोविंदाने राहतात. हिंदू समाज बांधवांची दिंडीचे स्वागत मुस्लिम बांधव करतात, तर मुस्लिम बांधवांच्या इतर कार्यक्रमात हिंदू बांधवही सहभागी होतात. एकीकडे अगदी छोट्या कारणावरून दोन समाजात तेढ निर्माण होत असताना साकेगाव येथील हिंदू बांधवांनी एकात्मतेचे दर्शन घडवत रमजाननिमित्त इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते. बालूमिया परिसरामध्ये इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले. गावात सौहार्द, एकात्मता टिकून राहावी आपसातील भाईचारा वाढावा, माणुसकीच्या नात्याने प्रत्येकाने एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी व्हावे हा उद्देश असल्याचे डॉ. कैलास ठाकरे यांनी सांगितले. मौलाना फिरोज उमरी, जगदीश वळवी, पियुष पाटील, जाकीर पटेल, वासेफ पटेल, अलाउद्दीन शेख, अन्सार पटेल, रियाज पटेल, मोसिन पटेल, मजीद शेख, दानिश शेख, पप्पू पटेल, आसिफ पटेल, रमजान पटेल यांच्यासह समाज बांधव बच्चे कंपनी आदींची मोठी उपस्थित होती.

### प.पु. डॉ. हेडगेवार चौकात आज भूमिपूजन सोहळा

प्रतिनिधी । भुसावळ

शहरातील प.पु. डॉ. केशव बळीराम हेडगेवार चौकाच्या सुशोभीकरण व नूतनीकरण कामाचे भूमिपूजन गुरुवार दि.१९ मार्च रोजी सकाळी ११वाजता आयोजित करण्यात आले आहे. आमदार राजूमामा भोळे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या भूमिपूजन सोहळ्यास प्रमुख रजनीकांत कोठारी, महापौर काळे उपस्थित राहणार आहेत.

# जिल्हा कबड्डी निवड चाचणीत भुसावळचे महाबली प्रथम

प्रतिनिधी । भुसावळ

**जळगाव जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या वतीने आयोजित ७३ वी जिल्हा पुरुष व महिला अजिंक्यपद व निवड चाचणी कबड्डी स्पर्धा २०२५-२६ स्व. बबनभाऊ बाहेती महाविद्यालय, जळगाव येथे दि.१४ व १५ मार्च २०२६ या कालावधीत उत्साहात पार पडली.**



या स्पर्धेत मुलांच्या २६ संघांनी तर मुलींच्या ६ संघांनी सहभाग नोंदवला. जळगाव, भुसावळ, भडगाव, पाचोरा, एरंडोल, रावेर, मुक्ताईनगर आणि जामनेर या तालुक्यातील संघांनी स्पर्धेत भाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या झालेल्या सामन्यांमध्ये पुरुष गटात महाबली क्रीडा प्रसारक मंडळ, भुसावळ यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला. अंतिम सामन्यात महाबली मंडळाने क्रीडा रसिक स्पोर्ट्स क्लब, जळगाव यांच्यावर ४४-३६ अशा ९ गुणांच्या फरकाने विजय मिळवत विजेतेपद पटकावले. या सामन्यात महाबली संघाने सुरुवातीपासूनच आघाडी राखली. महाबली संघाकडून प्रथमेश पाटील यांनी उत्कृष्ट चढाया करत संघाला महत्त्वाचे गुण मिळवून दिले. त्यांना मनीष निकम, जीवन नायदे, देवाक पाटील, गणेश लोहार, विक्की खंडारे, वेदांत ठोसर आणि चेतन लोहार यांनी क्षेत्ररक्षणात भक्कम साथ दिली. संघाचे प्रशिक्षक संकेत माने तर संघ व्यवस्थापक म्हणून टीकाराम पाटील यांनी जबाबदारी सांभाळली. पुरुष गटात द्वितीय क्रमांक क्रीडा रसिक स्पोर्ट्स क्लब, जळगाव तर तृतीय क्रमांक महर्षी वाल्मीक संघ, जळगाव जळगाव यांनी मिळवला. महिला गटात जय श्रीराम स्पोर्ट्स क्लब, पहर पाळधी यांनी प्रथम क्रमांक मिळवला. क्रीडारसिक स्पोर्ट्स क्लब, जळगाव यांनी द्वितीय तर नेताजी सुभाष व्यायामशाळा, जळगाव यांनी तृतीय क्रमांक पटकावला. स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्यास जळगाव जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सहकार्यवाहक नितीन बर्डे, कार्याध्यक्ष शाम कोगटा, उपमहापौर मनोज चौधरी, रोहन बाहेती, पंच प्रमुख सुनील राणे, महेश बुटी आणि गिरीश नाईक यांची प्रमुख उपस्थिती होती. पंच म्हणून हरीश शेळके, आनंद महागडे, अनिल कोळी, रितेश तायडे, गजानन पाटील, आबा महाजन, नयन सागर मणी, गणेश पाटील, नितीन पाटील, हितेश सोनी, सचिन पाटील, नम्रता गुरव आणि सुरेखा कोळी यांनी उत्कृष्ट निरीक्षण व अचूक निर्णय देत स्पर्धा सुरळीत पार पाडली.

# भुसावळ नगरपालिकेची सभा पुन्हा तहकूब

## सत्ताधारी-विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी? पालिकेला छावणीचे स्वरूप

प्रतिनिधी । भुसावळ

**शहराच्या विकासाच्या मुद्यांवरून भुसावळ नगरपालिकेची साधारण सभा पुन्हा एकदा गदारोळात तहकूब करण्यात आली. आधीच वादग्रस्त ठरलेली ही सभा आज (मंगळवार) पुन्हा घेण्यात आली होती. मात्र सत्ताधारी आणि विरोधकातील तीव्र वादामुळे अखेर सभा २३ मार्चपर्यंत पुढे ढकलावी लागली.**

सभेला सुरुवात होताच वातावरण तापले. भाजपा पदाधिकाऱ्यांनी नगराध्यक्षांना काही प्रश्न विचारण्याचा देण्याचा प्रयत्न केला. परंतु सत्ताधारी नगरसेविकांनी त्याला विरोध दर्शवल्याने आधी महिलांमध्ये, त्यानंतर पुरुष नगरसेवकांमध्ये तीव्र शाब्दिक चकमक झाल्याचे समजते. काही क्षणातच हा वाद उग्र रूप धारण करत दोन्ही गट समोरासमोर आले आणि सभागृहात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची चिन्हे दिसताच नगराध्यक्षा गायत्री भंगाळे व माजी आमदार संतोष चौधरी यांनी सभागृह सोडले. त्यानंतर सत्ताधारी गटातील सदस्यही बाहेर पडले आणि



सभा तहकूब करण्याचा निर्णय घेण्यात आला. दरम्यान, संभाव्य गोंधळ लक्षात घेता पोलिस प्रशासनाने नगरपालिकेच्या परिसरात कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. संपूर्ण परिसराला छावणीचे स्वरूप आले होते.

# गिरणा नदीपात्रातून अवैध वाळू वाहतूक सुरूच

## शिवसेना तालुका प्रमुखांनी दिला आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी । पाचोरा

**तालुक्यातील माहिजी येथील गिरणा नदीपात्रातून अवैध वाळू वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असुन महसूल विभाग याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करीत असल्याची तक्रार निवेदनाद्वारे शिवसेना पाचोरा तालुका प्रमुख विनोद भिकन पाटील नांद्रा यांनी तहसिलदार विजय बनसोडे, तसेच माहिस्तव उपविभागीय अधिकारी, जिल्हा अधिकारी व महसूल मंत्र्यांना दिली आहे.**



महसूल विभागाला दिलेल्या निवेदनात तावडे यांनी नमुद केले आहे की, कुरंगी गट न. ६ शेजारच्या माहिजी येथील गिरणा नदीपात्रातून जेसीबीच्या साह्याने उचल करुन शेकडो डंपर, टिपर व ट्रॅक्टरच्या सहायाने मोठ्याप्रमाणावर वाळू वाहतूक सुरू आहे. महसूल प्रशासनाला लेखी व तोंडी सूचना देऊन देखील महसूल प्रशासन दुर्लक्ष करीत आहे. तसेच नांद्रा गावाजवळ माहिजी येथील गिरणा नदीपात्रात अवैध वाळू वाहतूक जोरात सुरू आहे. ही वाळू वाहतूक कोणाच्या आशिर्वादाने सुरू आहे. या वाळू वाहतुकीमुळे परिसरातील पोलीस व आर्मी भरतीची तयारी करणाऱ्या गोरगरीब मुलांना त्रास होतो. त्या मुलांनी तहसीलदाराकडे तक्रार केल्यानंतर काही दिवसांनंतर मुलांना मारण्याच्या धमक्या दिल्या गेल्या.

तसेच माहिजी, कुरंगी, वरसाडे येथून विद्यार्थी नांद्रा येथील हायस्कूल येथे ये-जा करीत असतात. त्यामुळे पालक वर्ग देखील चिंतेत आहेत. त्यांचीही दखल घेतली नाही. तसेच रोज रात्री नांद्रा बसस्टॉपवर धुमाकूळ घातला जातो. जोरजोरात ओरडत भांडणे होतात. चाकू सारखे हत्यारे बाळगतात. त्यांच्या भांडणामुळे एखाद्या निष्पाप लोकांचा जीव जाऊ शकतो. कारण रात्री- अपरात्री हे चाकू सारखे हत्यारे घेऊन फिरतात.

**माहेजीत रोडाला लागून असलेल्या रहिवासींना वाहतूकीमुळे त्रास होतो. ट्रॅक्टरच्या आवाजाने लोकांना झोप लागत नाही. ट्रॅक्टरच्या आवाजाने लहान मुले झोपेतून उठून जातात. तक्रार देणाऱ्यांना चाकूचा धाक दाखवून धमकावले जाते. याला जबाबदार महसूल प्रशासन आहे. कुरंगी, नांद्रा, माहिजी, डोकलखेडा, आसनखेडा, दहिगाव, लासगाव, राणीचे बामरुड, वरसाडे, परधाडे, दुसखेडा, वेरुळी अशा १०,१२ गावच्या पिण्याच्या योजना सुरू आहेत.**

# इनरव्हील क्लबतर्फे दीड हजार कापडी पिशव्यांचे वाटप,



प्रतिनिधी । जळगाव

**इनरव्हील क्लब ऑफ जळगाव ईस्टचा उपक्रम जळगाव वाढत्या प्रदूषणाला आळा घालण्यासाठी आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी 'प्लास्टिक हटाव'चा संदेश देत इनरव्हील क्लब ऑफ जळगाव ईस्टतर्फे शहरात व्यापक कापडी पिशवी वाटप मोहीम राबवण्यात आली.**

त्या पिशव्यांमधील भाजीपाला तात्काळ रिकामी करून तो क्लबतर्फे देण्यात आलेल्या कापडी पिशव्यांमध्ये भरून देण्यात आला. हा उपक्रम इनरव्हील क्लबच्या डिस्ट्रीक्ट चेअरमन रमा गर्ग आणि पीडीसी तथा डीपीसीसी संगीता घोडगावकर यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा सिमरन पाटील आणि सचिव रितू शर्मा यांनी नियोजन केले. नागरिकांनी प्लास्टिकचा वापर टाळण्याचा संकल्प केला.